# गुजरा हुआ जमाना...


प्यासाः गुरूदत्तचा क्लासिक चित्रपट


आवाराः राज-नरगीस


ब्लॉकब्लस्टर गंगाजमना


मास्टरपीस गाईड

**१९१३ ते १९३४ हा मूकपटांचा काळ नि १९३४ ते आजतागायत बोलपटांच्या काळात हिंदी चित्रपटात अनेक स्थित्यंतरे झाली, अनेक प्रवाह आले आणि गेले. मात्र या प्रवाहांमध्ये काही मैलांचे दगडही या चित्रपटसृष्टीत आपले ठसे स्पष्ट उमटवून गेले. त्या अजरामर कलाकृतींची घेतलेली ही नोंद...**

□ यासीन दलाल

इंग्लंडचे लुमियेर बंधू इंग्लंडमध्ये मूव्ही कॅमेरा बनवण्यासाठी सतत प्रयत्नशील होते आणि त्यांच्या अथक प्रयत्नांना यश येऊन चित्रपटाची त्यातून निर्मिती झाली. या काळात भारतातच नव्हे तर जगभरात अनेक चित्रपट आले जे समाज व देशासाठी मार्गदर्शक ठरले. चित्रपट हे मनोरंजनाचे साधन भले असले तरी मनोरंजनातून समाज उद्‌बोधन हाच त्याचा मुख्य हेतू होता. म्हणूनच तर समाजाच्या अनेक स्थित्यंतरांमध्ये चित्रपट हा एक प्रमुख स्रोत राह्यला. बॉम्बे टॉकीजच्या *किस्मत* चित्रपटातील 'दूर हटो ये दुनियावालो हिंदुस्तान हमारा है...' हे गाणे ऐकल्यावर जनसामान्यांच्या अंगात स्फूर्ती संचारली आणि अनेक लोक स्वातंत्र्य-लढ्यात सामिल झाले. व्ही. शांतारामांच्या *दहेज* चित्रपटाने प्रभावित होऊन अनेक कुटुंबांनी हुंड्याला बंदी केली. प्रभातच्या *पडोसी* (किंवा मराठीत *शेजारी*) चित्रपटाने हिंदू-मुसलमानांमध्ये एकोपा निर्माण केला.

आपल्या देशात पहिला चित्रपटाचा खेळ लागला तो १८९६ साली मुंबईच्या वॉटसन हॉल (आत्ताच्या मेट्रो सिनेमा शेजारी) मध्ये. ब्रिटीश सरकारच्या आमदानीत तेव्हा ब्रिटन वा युरोपमध्ये लागलेला शोध त्वरीत भारतात यायचा. लुमियेर बंधू आपली पाच-दहा मिनिटांची चलचित्रे घेऊन भारतात आले तेव्हा

फिल्मिलेनियम २०००

पडद्यावरची हालणारी चित्रे बघून भारतीय अवाक् झाले होते. यानंतर *पुंडलिक* नावाचा एक चित्रपट मराठी माणसाने बनवला. त्यांचे नाव तोरणे. मात्र हा फारच लहान चित्रपट होता. खऱ्या अर्थाने चित्रपटाचे तोरण आपल्या देशात बांधले ते दादासाहेब फाळके यांनी. *राजा हरिश्चंद्र* हा त्यांनी बनवलेला पहिला चित्रपट.

दादासाहेबांनी येशू ख्रिस्ताच्या जीवनावर बनवला गेलेला चित्रपट पाह्यला व त्यांनी भारतात येऊन आपल्याकडच्याही काही पुराणकथांवर चित्रपट बनवण्याचे तंत्र शिकून घेतले. त्या काळात बायका घराबाहेर पडत नसत. नाटक-सिनेमात काम करणे म्हणजे उठवळपणाचे लक्षण मानले जात असल्याने कुणी स्त्री चित्रपटात तारामतीची भूमिका करायला पुढे आली नाही. तेव्हा हॉटेलात वेटरचे काम करणाऱ्या साळुंके नामक गृहस्थांना दादासाहेबांनी तारामतीची भूमिका करण्यास लावले. *राजा हरिश्चंद्र* मुंबईत पडद्यावर झळकला तेव्हा देशभरात खळबळ माजली. लोक हा प्रयोग पाह्यला दुरून येत होते.


शास्त्रीय संगीत विशारदाच्या जीवनावरचा
झनक झनक पायल बाजे

### मूकपटांचे युग

या प्रारंभीच्या मूकपटांमध्ये मारामाऱ्या व ॲक्शनचे प्रमाण खूप होते. पण ते स्वाभाविकही होते. या स्टंटपटांव्यतिरिक्त धार्मिक चित्रपटांचा तो काळ होता. पडद्यावरच संवाद लिहिले जात आणि संगीत देण्यासाठी चित्रपटगृहातच एका कोपऱ्यात वादक बसत. हळुहळू हा काळ ओसरला. सामाजिक समस्या दाखवणारे चित्रपट येत गेले. निर्माते-अभिनेते धीरेन गांगुली यांनी *फॉरेन रिटर्न* नामक चित्रपट बनवला होता त्यात आजच्या सुभाष घई यांच्या *परदेस* चित्रपटसारखीच कथा होती. या मूकपटांच्या काळात हिमांशु राय यांच्या *लाईफ ऑफ एशिया* व *कर्म* सारखे संस्मरणीय चित्रपट बनले.

कलकत्त्यात मादन थिएटरने *शिरी फरहाद* बनवलेला. नादिरा व जॉन कावस यांच्या *हंटरवाली* सारखा चित्रपट पाहून प्रेक्षक चित्रपटगृह डोक्यावर घेत.

### चित्रपट बोलू लागला

१९३१ साली अरदेसर ईरानी नामक पारशी इसमाने पहिला बोलपट *आलमआरा* मुंबईच्या मॅजेस्टिक सिनेमात रूजू केला आणि हिंदी सिनेमात बोलपटाचा काळ सुरू झाला. पडद्यावर कलाकारांना चालता-नाचताना पाहूनच लोक थक्क होत होते. आता तर पडद्यावरची चित्रं बोलूही लागली होती. लोकांच्या आनंदाला सीमा राह्यली नाही. नंतरच्या दोन वर्षात न्यू थिएटर्स, बॉम्बे टॉकीज, मिनर्व्हा, रणजीत, प्रभात सारख्या चित्रपट कंपन्या बोलपट बनवू लागल्या. नवनवे कलाकार येऊ लागले, कथेत वैविध्य येऊ लागले. त्यामुळे चित्रपट हा जनसामान्यांच्या दुःखावरचे एक औषध झाला. जनसामान्यांची दुःखे चित्रपटाची दुःखे झाली तर त्यांची सुखे चित्रपटाची सुखे झाली.


> ❝ १९३१ साली अरदेसर ईरानी नामक पारशी इसमाने पहिला बोलपट आलमआरा मुंबईच्या मॅजेस्टिक सिनेमात रूजू केला आणि हिंदी सिनेमात बोलपटाचा काळ सुरू झाला. पडद्यावर कलाकारांना चालता-नाचताना पाहूनच लोक थक्क होत होते. आता तर पडद्यावरची चित्रं बोलूही लागली होती. लोकांच्या आनंदाला सीमा राह्यली नाही. ❞



### समाज प्रबोधनाची कामगिरी

१९३५च्या न्यू थिएटर्सचा *देवदास* व १९३७ सालचा *विद्यापती* या चित्रपटांनी महान चित्रपटाचे युग सुरू केले. बॉम्बे टॉकीजने १९३६ साली *अछूत कन्या* बनवला. देविकाराणी व अशोककुमार अभिनित या अस्पृश्यताविरोधी चित्रपटाने लोकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले. तर १९३७ सालच्या व्ही. शांताराम यांच्या *दुनिया न माने* चित्रपटाने जरठ-बाला विवाहपद्धतीवर घाला घातला. तर दारूच्या नशेत बरबाद होणाऱ्या युवापिढीला योग्य मार्गावर आणण्यासाठी त्यांनी *आदमी*ची निर्मिती केली. सिनेमा ऐन उमेदीत होता त्यामुळे देशात अनेक नवी चित्रपटघरे बांधली जाऊ लागली. आधी चित्रपटात काम करणाऱ्या मंडळींकडे वाईट नजरेने पाह्यले जात होते. पण चित्रपट आंतरराष्ट्रीय ख्याती मिळवू लागला, समाज प्रबोधन करू लागला तेव्हा चित्रपटाला प्रतिष्ठा मिळू लागली. पडद्यावरचे कलाकारही हळूहळू लोकांचे आदर्श बनू लागले. स्वातंत्र्य चळवळीचे वारे देशात वाहात असताना देशप्रेम व सामाजिक परिवर्तनाचा हेतू बाळगणारे चित्रपट पडद्यावर येऊ लागले. हे चित्रपटही क्रांती घडवण्याच्या उद्देशाने बनवले गेले.

दुसरे महायुद्ध सुरू झाले. अख्ख्या जगात आर्थिक मंदी आली. याचा परिणाम चित्रपटांवरही पडला. यामुळे न्यू थिएटर्स, बॉम्बे टॉकीज, प्रभातसारख्या कंपन्या जवळजवळ बंद पडल्या. व्यक्तिगतरित्या लोक चित्रपट बनवू लागले. तर दुसरीकडे स्टार सिस्टम उदयाला येऊ लागली. या परिस्थितीत ज्या निर्मात्यांनी स्टार सिस्टमशी लढा देऊन आपला मोर्चा












१ न भूतो न भविष्यती : मदर इंडिया

२ सुपरस्टारचा जन्म: आराधना

३ बिमल रॉय यांचा क्लासिक दो बिघा जमीन

४ अजरामर शोले

५ के. आसिफ यांचा ग्रेट मुगल-ए-आझम

बांधला त्यात बिमल रॉय, राज कपूर व गुरूदत्त अग्रणी होते. इटालीचे ज्येष्ठ चित्रनिर्माते वित्तोरियो द सिका यांच्या *बायसिकल थीफ* वरून प्रेरणा घेऊन बिमल रॉय यांनी *दो बिघा जमीन* चित्रपट बनवला. या चित्रपटात गरीब खेडूताची भूमिका बलराज साहनींनी केली. या पात्राद्वारा गरीब खेडूताच्या दुःखाला बिमल रॉय यांनी वाचा फोडली. इटालीच्याच *शू शाईन* चित्रपटावरून प्रेरणा घेऊन राज कपूरनी *बूट पॉलीश* चित्रपट बनवला आणि अनाथ बालकाचे दुःख त्यात मांडले. या चित्रपटात बेबी नाझ व रतनकुमार यांनी प्रेक्षकाला अक्षरशः धो धो रडवले.

बोलपटाच्या आज पर्यंतच्या सात दशकांमध्ये १९५५ ते ६० च्या पाच वर्षांमध्ये लागोपाठ श्रेष्ठ चित्रपटांची निर्मिती झाली. बिमल रॉय यांचा *देवदास*, गुरूदत्त यांचा *प्यासा*, मेहबूब यांचा *मदर इंडिया*, व्ही. शांताराम यांचा *दो आँखे बारह हाथ* असे उत्कृष्ट चित्रपट लागोपाठ पडद्यावर झळकले आणि हिंदी सिनेमाचे सिंहासन जणू या माणकांनी मढवले गेले.

### *प्यासा*

गुरूदत्त यांच्या *प्यासा*मध्ये संवेदनशील साहित्यिकाची स्वार्थी समाजात कशी विटंबना होते त्याचे हृदयस्पर्शी चित्र *प्यासा*त दाखवले गेले. त्या चित्रपटातले नायकाच्या तोंडचे 'ये दुनिया अगर मिल भी जाये तो क्या है' हे गीत नायक विजयचेच नसून जनसामान्यांचे झाले. स्वार्थासाठी लेखकावर प्रेम करणारी व प्रकाशकाबरोबर लग्न करणारी माला सिन्हा हिच्यापुढे गुलाबो नामक वेश्येला उच्च कोटीची दाखवून समाजातील शिक्षित वर्गाच्या दांभिकपणावर कोरडे ओढले. वेश्यागृहात फिरताना नायक अचंबित होऊन विचारतो की, जिन्हें नाझ है हिंद पर वो कहाँ है? आपण ज्या संस्कृतीचे गोडवे गातो ती संस्कृतीच एवढ्या मोठ्या वेश्या व्यवसायाला निर्माण करते. समाजाचे हे दुटप्पी धोरण एका गाण्यातून प्रभावीपणे व्यक्त झाले होते.

### *देवदास*

यशस्वी चित्रपट त्यालाच म्हणायचे जो तथाकथित प्रवाह बदलून टाकतो. या दृष्टीने न्यू थिएटर्सचा सायगलची भूमिकावाला *देवदास* व त्यानंतर १९५७ साली आलेला बिमल रॉय, यांचा दिलीपकुमारची भूमिकावाला *देवदास* अजोड म्हणावे लागतील. *देवदास*मधील 'कौन कम्बख्त बरदास्त करने के लिये पीता है? मैं तो पिता हूं कि बस सांस ले सकूं...' हा संवाद खूप लोकप्रिय झालेला. दारूड्याची भूमिका यापूर्वी दिलीपकुमारने अमिया चक्रवर्तींच्या *दाग* चित्रपटात केली होती. पण या *देवदास*मध्ये युसुफ खानचा कायापालट बिमल रॉयनी केला. *मुगल-ए-आझम*मधील अकबराच्या भूमिकेसाठीच जणू पृथ्वीराज कपूर जन्मले होते. तसाच *देवदास*च्या भूमिकेकरताच दिलीपकुमार जन्मला होता नि *प्यासा*च्या विजयसाठी गुरूदत्त जन्मला होता असे वाटावे, इतकी ती पात्रे त्यांनी ठसठशीत केली.

*देवदास* शरदबाबूंच्या एका गाजलेल्या

**१९५५ ते ६० च्या पाच वर्षांमध्ये लागोपाठ श्रेष्ठ चित्रपटांची निर्मिती झाली. बिमल रॉय यांचा *देवदास*, गुरूदत्त यांचा *प्यासा*, मेहबूब यांचा *मदर इंडिया*, व्ही. शांताराम यांचा *दो आँखे बारह हाथ* असे उत्कृष्ट चित्रपट लागोपाठ पडद्यावर झळकले आणि हिंदी सिनेमाचे सिंहासन जणू या माणकांनी मढवले गेले.**

कादंबरीवर बनला असल्याने बंगालपासून ते महाराष्ट्रापर्यंत *देवदास* गाजला. पार्वती व चंद्रावतीच्या पात्रात सुचित्रा सेन व वैजयंती माला या अभिनयाच्या स्पर्धेत उतरल्या. एस. डी. बर्मन यांनी तलत मेहमूद यांच्या मखमली स्वरात रचलेल्या मितवा... सारख्या गाण्यांनी प्रेक्षकांना भावनावेगाने खेचून घेतले.

### *मदर इंडिया*

याच प्रकारे *मदर इंडिया*मध्ये मेहबूब खान यांनी राधा नामक नायिका भारतातील जमीनदारांच्या शोषणाचा बहादुरीने सामना करते आणि शोषणकर्त्यांशी युद्ध करताना आपल्या पोटच्या मुलाचे बलिदान देते. ऑस्कर पुरस्काराच्या नॉमिनेशनसाठी चित्रपटाची निवड झालेला हा पहिलाच भारतीय चित्रपट होता. त्या चित्रपटाने हिंदी सिनेमाच्या इतिहासात एक नवीन प्रवाह आणला.

राज कपूरच्या कॅम्पमधून नरगीस बाहेर पडली आणि *मदर इंडिया* चित्रपटादरम्यान आगीच्या अपघातातून सुनील दत्तने वाचवल्याबद्दल त्याच्याशी विवाहबद्ध झाली. या चित्रपटाद्वारा राजेंद्रकुमार व राजकुमार या दोन अभिनेत्यांचा उदय झाला आणि या प्रकारच्या चित्रपटांचे युग सुरू झाले. नरगीसला या चित्रपटाबद्दल कार्लाव्हो व्हेरी महोत्सवात श्रेष्ठ अभिनयाचा पुरस्कारही मिळाला. मात्र या चित्रपटानंतर नरगीसने चित्रपट संन्यास घेतला.

### *दो आँखे बारह हाथ*

व्ही. शांताराम यांचा *दो आँखे बारह हाथ* त्या काळात बनलेला अगदी साधा चित्रपट. पण त्यात खतरनाक कैद्यांचे तुरूंगात पुनर्वसन करणाऱ्या जेलरची अत्यंत हृदयंगम रित्या कथा मांडली गेली होती. त्यामुळे हा चित्रपट खूप चालला. तो खरंतर सामाजिक चित्रपट किंवा रोमँटिक चित्रपटांचा काळ होता. पण या चित्रपटात कुठेही शांताराम व संध्या यांची प्रणयदृश्ये नव्हती तरीही चित्रपटाने तिकीटबारीवर पाऊस पाडला होता. यावरून त्या काळातील प्रेक्षकांची अभिरूची किती उच्च होती हेच दिसेल. यानंतर दिलीपकुमारचा *गंगा जमना* आला.


### *गंगा जमना*

दिलीपकुमार यांनी स्वतः *गंगा जमना*ची निर्मिती केली. या चित्रपटानेही इतिहास निर्माण केला. ईगतपुरीच्या जवळच्या गावात आकार घेणारी ही कथा खूपच प्रभावीपणे मांडली होती. आणि यातील दिलीपकुमार-वैजयंतीमालाचा सदाबहार अभिनय व संगीत ही या चित्रपटाची आकर्षण केंद्रे होती. याच सुमारास राज कपूरने याच विषयावर *जिस देश में गंगा बहती है* चित्रपट बनवला व सुनील दत्तने *मुझे जीने दो* केला. पण *गंगा जमना* यात बाजी मारून गेला.

### *मुगल-ए-आझम*

सोहराब मोदींनी मिनर्व्हा बॅनरद्वारा *सिकंदर*, *पृथ्वीवल्लभ* आणि *पुकार* सारखे भव्य ऐतिहासिक चित्रपट बनवले होते. परंतु या प्रकारच्या चित्रपटात *मुगल-ए-आझम* हा के. आसिफ यांचा चित्रपट अद्वितीयच ठरला. १९६० साली आलेल्या या चित्रपटाचे संवाद लोक आज चाळीस वर्षांनंतरही विसरलेले नाहीयत. त्यांचा *शीशमहल*चा सेट तसेच पृथ्वीराज, मधुबाला व दिलीपकुमार यांचा अभिनय, नौशाद यांचे कर्णमधूर संगीत व युद्धाची दृश्ये या चित्रपटाला श्रेष्ठ चित्रपटांच्या पंक्तीत नेऊन बसवणारी होती. *मुगल-ए-आझम* हे के. आसिफ यांचे स्वप्नच होते. जे साकार करायला त्यांना आपल्या संपूर्ण जीवनाची बाजी लावावी लागली. या चित्रपटानंतर त्यांची जीवननैया दोलायमान झाली. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांचे चित्रपट निर्मिती करणे मंदावले आणि *मुगल-ए-आझम*च्या कैफातून ते बाहेरच पडू शकले नाहीत. परिणामी त्यांचा शेवटचा *लव्ह अ‍ॅण्ड गॉड* चित्रपट *मुगल-ए-आझम*ची लोकप्रियता मिळवू शकला नाही.

याचप्रकारे बी. आर. चोप्रा यांचे चित्रपट देखील उद्देशपूर्ण सामाजिक चित्रपटाचे होते.



अभिनयाचे सीमाचिन्ह देवदास



अछूतकन्या

त्यांच्या *एक ही रास्ता* या पहिल्या चित्रपटात विधवाविवाहाचा मुद्दा मांडला गेला. *नया दौर*मध्ये बस व रिक्षा आल्याने घोडागाडी व बैलगाड्यावाल्यांचा रोजगार संपला हा विषय, *धूल का फूल*मध्ये अनैतिक संततीचा प्रश्न, *धर्मयुग*मध्ये हिंदू-मुसलमान ऐक्य व *निकाह*मध्ये मुसलमान स्त्रीच्या जाणीवा त्यांनी प्रकट केल्या होत्या. या त्यांच्या चित्रपटातील कुठलाही चित्रपट महान चित्रपटाच्या श्रेणीत जाऊन बसला नाही तरी त्यांच्या या चित्रपटांची नोंद घेणे वेळोवेळी अत्यावश्यक ठरलेले आहे.


दो आँखे बारह हाथ


हीर रांझा हिट प्रेमकथा

### समांतर सिनेमा

६५-७०च्या युगात गुलजार, हृषिकेश मुखर्जी व बासू चॅटर्जींसारख्या दिग्दर्शकांनी समांतर सिनेमाचा प्रवाह सुरू केला. त्यांचे चित्रपट शुद्ध कलात्मक चित्रपट नसले तरी सुमार चित्रपटांहून त्यांची कक्षा कितीतरी वरची होती. त्यात गीतसंगीत व कॉमेडीचा दर्जाही उत्तम होता. खूप झगमगाटी असे त्याचे स्वरूप नसले तरी कसबी कलाकार व ठोस कथा घेऊन ते बनवलेले होते. हृषिकेश मुखर्जींनी *अनुपमा*, *आराधना* हे चित्रपट बनवले तर गुलजार यांनी *कोशीश*, *मौसम* व *किनारा* हे चित्रपट दिले. बासू चॅटर्जींनी *रजनीगंधा*, *छोटीसी बात*, *खट्टामिट्टा* व *शौकीन* सारखे चित्रपट दिले.

### *किस्मत*ने प्रवाह बदलला

हिंदी चित्रपटांच्या प्रवाहाबद्दल बोलायचे झाले तर कित्येक असे चित्रपट निघतील की, ते अन्य दृष्ट्या संस्मरणीय भले नसले तरी त्यांच्या काळात चित्रपटनिर्मितीवर त्या त्या चित्रपटांनी जोरदार प्रभाव पाडला होता. बरीच परिवर्तने आणली होती. अशा चित्रपटांबद्दल बोलताना बॉम्बे टॉकीजच्या *किस्मत*चे नाव पहिले घ्यावे लागेल. १९४०साली आलेल्या या चित्रपटात अशोककुमार यांनी पडद्यावर प्रथमच अॅन्टी हीरो रंगवला. असा हातात पिस्तुल घेऊन वावरणारा हीरो हिंदी पडद्याला नवाच होता. त्यामुळे तत्कालीन समीक्षकांनी या चित्रपटावर खूप टीकाही केलेली. मात्र हा चित्रपट तिकीटबारीवर तुफान चालला. कलकत्त्याच्या रॉक्सी चित्रपटगृहात सतत चार वर्षे हा चित्रपट चालला. *शोले*पेक्षाही हा यशस्वी ठरलेला चित्रपट आहे. या चित्रपटाने एक नवा प्रवाह हिंदीत आणला. जो *आवारा*, *श्री ४२०* या चित्रपटांमध्ये पुरेपूर विकसित होताना दिसला.

याचप्रमाणे १९५१ साली गुरूदत्तनी देव आनंदच्या नवकेतन संस्थेकरता *बाजी* चित्रपट बनवलेला. या चित्रपटातही जुगाराच्या


*१९४०साली आलेल्या या चित्रपटात अशोककुमार यांनी पडद्यावर प्रथमच अॅन्टी हीरो रंगवला. असा हातात पिस्तुल घेऊन वावरणारा हीरो हिंदी पडद्याला नवाच होता. त्यामुळे तत्कालीन समीक्षकांनी या चित्रपटावर खूप टीकाही केलेली. मात्र हा चित्रपट तिकीटबारीवर तुफान चालला. कलकत्त्याच्या रॉक्सी चित्रपटगृहात सतत चार वर्षे हा चित्रपट चालला.*


अड्ड्यावरच नायक कायम पडलेला असतो, असे दाखवलेले. संपूर्ण चित्रपट जुगाराच्या क्लबमध्येच आकार घेतो त्यामुळे यात क्लबगीते होती. हा चित्रपटही खूप गाजला, यातले संगीत, क्लबगीते खूप गाजली आणि क्लबगीतांचा एक नवा प्रकार हिंदी चित्रपटात आला.

पण अशा चित्रपटांबरोबर गुरूदत्तनी *प्यासा*, *साहब बीवी और गुलाम*सारखे गंभीर चित्रपटही बनवलेले.

१९५९ साली नाझिर हुसेननी फिल्मीस्तान संस्थेतून वेगळे होऊन *तुमसा नहीं देखा* चित्रपट बनवला आणि बिनधास्त (आजच्या भाषेत टपोरी) हीरोची प्रथा पाडली. यात शम्मी कपूर त्या भूमिकेत होता. या चित्रपटाने शम्मी रातोरात स्टार झाला आणि 'सर पे टोपी लाल हाथ में रेशम का रूमाल हो तेरा क्या कहना...'सारखी गाणी लोकांच्या जीभेवर बसली.


यानंतर शम्मीचा *जंगली*, *कश्मिर की कली* यासारखे चित्रपट आले आणि शम्मी तरूणींच्या गळ्यातला ताईत झाला.

१९६५-७०च्या सुमारास रंगीत चित्रपटाचे युग आले व एकीकडे शम्मी कपूर सारखा अवखळ नायक तर दुसरीकडे *आराधना*तला गंभीर राजेश खन्ना नि *आन मिलो सजना*तला धर्मेंद्र यांचे युग सुरू झाले. यावेळी राज, दिलीप व देव आनंद यांचा बहर कमी होत गेला.

१९३१ पासून १९९९ पर्यंत सात दशकात सुमारे साडेसात हजार ते आठ हजार हिंदी चित्रपट बनले. यापैकी काही उत्तम चित्रपट निवडण्याचे काम खूप कठीणही नव्हते. कारण उत्तम कलाकृती नेहमीच कमी बनतात. कित्येक चित्रपट तिकीटबारीवर अपयशी ठरले तरी त्यांची गुणवत्ता नोंद घेण्यासारखी नक्कीच होती. तर काही चित्रपट तिकीटबारीवर यशस्वी ठरले म्हणून ते गुणवत्तापूर्ण होतेच असे नाही. याचेच उदाहरण म्हणून *शोले*चे नाव घेता येईल. हा चित्रपट तुफान चालला



*बंदिनी*: नूतनचा अभिनयाविष्कार



रशियापर्यंत पोहोचलेला *मेरा नाम जोकर*

पण त्यात कलात्मक असे कुठले गुण नव्हते. सलीम-जावेद यांची पटकथा व रमेश सिप्पींचे दिग्दर्शन याच चित्रपटाच्या जमेच्या बाजू नव्हत्या तर प्रत्येक लहानमोठ्या कलाकाराचा अभिनय अत्यंत प्रभावी नि उत्कट होता. संजीवकुमारपासून ते जगदीपपर्यंत सर्वच पात्रे प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडून गेली होती. यात गब्बर सिंग व सांभा दंतकथाच बनले. *शोले*प्रमाणेच *दीवार*ही तिकीटबारीवर यशस्वी ठरला. या दोन्ही चित्रपटातील संवाद शेंबड्या पोरालाही तोंडपाठ आहेत. सलीम-जावेद यांनी जेमिनीच्या *इन्सानियत* या जुन्या चित्रपटाचे रूपांतर *शोले*त व *गंगा जमना*चे आधुनिक रूप म्हणून *दीवार* लिहिला, अशा रितीने सत्तर नंतर चित्रपटांचा मौलिक आधार तुटत गेला. जुन्या गाजलेल्या चित्रपटांवरून चित्रपट बनवण्याची परंपरा रूजू होऊ लागली.

आपल्याकडे विनोदी चित्रपटांचाही एक प्रवाह आला. त्यात गुरूदत्तचा *मि. ॲण्ड मिसिस ५५*, किशोरकुमारचा *चलती का नाम गाडी*, मेहमूदचा *पडोसन* उत्कृष्ट ठरले. याचप्रमाणे अमिया चक्रवर्तीचा *देख कबीरा रोया* व कालीदासचा *हाफ टिकट* हेही उत्तम कॉमेडीपट ठरले. अतिउत्कृष्ट चित्रपटांच्या यादीत जसे *प्यासा*, *मदर इंडिया*, *दो बिघा जमीन*, *देवदास* (बिमल रॉय), *आवारा*, *जोगन* (राज कपूर), *मुगल-ए-आझम*, *गंगा जमना*, *गाईड*, *दो आँखे बारह हाथ* हे चित्रपट अप्रतिम चित्रपट म्हणून दाखल झाले तसेच याच्या किंचित खालचा नंबर घेऊन *विद्यापती*, *कागज के फूल*, *श्री ४२०*, *अंदाज*, *दुनिया न माने*, *अनाडी*, *मिर्झा गालीब*, *किस्मत*, *शोले*, *फूटपाथ*, *हमलोग*, *धरती के लाल*, *जागते रहो*, *बंदिश*, *चंद्रलेखा*, *सत्यकाम*, *परिणिता*, *सीमा*, *साहब बीवी और गुलाम* या चित्रपटांचाही नंबर लागतो.

याशिवाय श्याम बेनेगल, बासू भट्टाचार्य, कल्पना लाझमी सारखे नामीगिरामी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कलात्मक चित्रपट बनवू लागले. *अंकूर*, *आविष्कार*, *रूदाली*, *शतरंज के खिलाडी*, *भुवनशोम*, *सारा आकाश*, *गर्म हवा*, *२७ डाऊन*, *सरदारी बेगम*, *एक पल* सारखे चित्रपट चित्रपटाच्या इतिहासात आपले वेगळे स्थान जमवत होते.

१९६५ साली देव आनंद यांचा *गाईड* आला व १९७० साली राज कपूर यांच *मेरा नाम जोकर* आला व यानंतर महान चित्रपटांचा स्रोतच खंडित झाला. आर्थिक यशाच्या दृष्टीने *शोले*, *जय संतोषी मां*, *हम आपके है कौन* हेच दखलपात्र ठरले. गेल्या दहा वर्षात मोठ्या बजेटचे भव्यदिव्य चित्रपट अनेक बनले. त्यात *खुदा गवाह*, *रूप की रानी चोरों का राजा*, *राजकुमार*, *चायना गेट* असे चित्रपट निर्माण केलले गेले. पण हे चित्रपट तिकीटबारीवर सपशेल गडगडले. आज चित्रपटसृष्टीत चिक्कार पैसा आहे. अद्ययावत तंत्र आहे. डिजीटल साऊंड, स्पेशल इफेक्टस् अशी संगणकीय खुबी वापरणारे तंत्रज्ञ आहेत, शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतलेले कसबी दिग्दर्शक व अनुभवी कलाकार आहेत पण चित्रपटाचा अंतरात्माच हरवला आहे. कुठेतरी काहीतरी बिनसले आहे. नाहीतर शांताराम, मेहबूब खान, गुरूदत्त, बिमल रॉय, राज कपूर सारखे महारथी जिथे वावरले त्या चित्रपट उद्योगात अशी अवकळा का दिसली असती? ●